MAH/MUL/03051/2012
ISSN-2319 9318

Special Issue February 2019
Peer Reviewed International Refereed Research Journal

# VIDYAWARTA

Special Issue – Vol. II



## VIMUKTA - NOMADIC CASTES – TRIBES & OTHER BACKSWORD CLASS: PRESENT CONDITIONS, DEVELOPMENT & CHALLENGES.

Guest Editor

Dr.B.K.Shep
Dr.R.D.Rathod
Dr.K.M.Bhange

63

# बीड जिल्हयातील बंजारा जातीची सद्यास्थिती व आव्हाण -एक समाजशास्त्रीय अभ्यास.

(विशेष संदर्भ गेवराई तालुका )

डॉ. तंगलवाड डी.एम.
सहाय्यक प्राध्यापक व समाजशास्त्र विभाग प्रमुख,
कला व विज्ञाध महाविद्यालय, शिवाजी नगर गढी,ता.गेवराई,जि.बीड

***********

**प्रस्तावना :-**

भारत हा विविधतेथे धटलेला देश आहे. भारतात विविध जाती जमातीचे, धर्म व पंथाचे लोक कायम वात्यव्य करुन राहतात.भारतीय समाजाचा इतिहास प्राचीनतम असुन त्याला ५००० वर्षांची परंपरा आहे. प्राचीन काळापासुन भारतातील वर्ण व्यवस्था व धंतर जाती व्यवस्था उदयाला आलेल्या असल्याचे विविध धार्मिक ग्रंथातुनदिसुन येते. उदा. महाभारतातील एकलव्य हा अधिवासी असल्याचे म्हटले जाते. म्हणुनच त्यांधा द्रोणाचार्यांधी धनुर्विद्या शिकविली नव्हती हे स्पष्ट होते. भारतातील जाती व्यवस्थे संदर्भात जी.एस.घुर्ये म्हणतात की, भारतीय समाजातील वर्ण व जाती व्यवस्था ही एक वैशिष्टयेपुर्ण सामाजिक व्यवस्था असुध जगातील कोणत्याही देशात अशी व्यवस्था थाही. भौतिक विकासाच्या प्रवाहात भारतातील अधेक सामाजिक समुह विकासाच्या प्रवाहापासुन कोसो दुर राहिले. त्यांना 'सापेक्ष विभक्त समुह 'असे म्हणतात. हे समुह भारतामध्ये प्रामुख्याने दलित,आदिवासी व भटके म्हणुध ओळखले जातात आजही अज्ञान व दारीद्रयामुळे त्यांच्या जिवनात विकासाच्या आशेचा किरण अजुनही उगवलेला दिसत नाही. महाराष्ट्रात अशा अनेक जाती जमाती आहेत. त्यापैकी सध्यास्थितीत १४ विमुक्त जाती व ३० भटक्या जमाती वास्तव्यास असुध त्यांधा इंग्रज सरकारथे १८७१ च्या क्रिमिनल ट्राइब्ज अॅक्ट नुसार गुन्हेगार म्हणुन घोषित केलेले होते. स्वातंत्र्य प्राप्तीनंतर त्यांना गुन्हेगार जमातीच्या कायद्यातुन भारताचे पहिले पंतप्रधान मा.पंडित जवाहरलाल नेहरुने मुक्त केले. पण अजुनही त्यांना लागलेला कलम पुसला गेलेला नाही.अशा अनेक जाती जमातींपैकी एक म्हणजे बंजारा ही जमात होय. प्रस्तुत संशोधनात बंजारा जातीचा सामाजिक,आर्थीक व शैक्षणिक स्थितीचा अभ्यास करण्याचा प्रयत्न केला आहे.

प्राचीन काळापासुन बंजारा समाज भारत भुमीवर वास्तव्य करणारा असुन त्याचे मुळस्थान आजच्या राज्यस्थान राज्यामध्ये असले मानले जाते. आज भारतातील २२ राज्यामध्ये वेगवेगळया भागात बंजारा समाज विखुललेला दिसुन येतो. एकेकाळी वैभवसंपन्न असलेला व्यापारी व व्यवसायीक समाज म्हणुध त्यांनी इतिहासात धोंद आहे.आपल्या वैशिष्टयेपुर्ण संस्कृती व रिती रिवाज व वेशभुषा यामुळे सहज लक्षात येणारी ही जमात असुन गायगाडयाशी त्यांचा जवळचा संबंध होता. मसालाच्या पदार्थाचा व्यापार करणारे, मोठया संख्येने गाई बैल पाळणारे लोक म्हणुन त्यांच्याकडे पाहिले जात होते. परंतु काळाच्या ओघात हा समाज भटकंतीला कसा लागला आणि या लोकांच्या जीवनाला दारीद्रयाधे कसा विळखा घातला याचा शोध घेण्यासाठी प्रस्तुत विषयाची निवड केली आहे.

**संशोधन विधान :-**

" बीड जिल्हयातील बंजारा जातीचा समाजशास्त्रीय अभ्यास " (विशेष संदर्भ गेवराई तालुका)

**संशोधनाची उद्दिष्टये :-**

१. बंजारा जातीचा ऐतीहासीक आढावा घेणे.

२. बंजारा जातीच्या पारंपारीक चाली रिती आणि प्रथा व परंपरा मध्ये झालेल्या वदलाचा अभ्यास करणे.

३. बंजारा जातीच्या आर्थीक व शैक्षणिक स्थितीचा अभ्यास करणे.

**संशोधनाची गृहितके :-**

१. बंजारा जात ही परंपरा प्रिय असुध निसर्ग पुजक आहे.

२. बंजारा जात विकासाच्या प्रवाहामध्ये काही प्रमाणात सहभागी झाली आहे.

३. बंजारा जातीला शासनाच्या विविध योजनाचा विशेष लाभ झाला नाही.

**नमुना निवड :-**

समग्र भारत देशातील बंजारा जातीचा अभ्यास करणे केवळ अशक्य आहे. म्हणुन समग्राचा लहनात लहान भाग म्हणुन बीड जिल्हयातील गेवराई तालुका अभ्यासासाठी निवडलेला आहे. यासाठी सहेतुक नमुना निवड तंत्राचा वापर केला असुध विविध तांडयावरील १०० उत्तरदात्याच्या प्रत्यक्ष मुलाखती घेऊन माहिती संकलीत करण्यात आली.

**संशोधनाची पध्दती :-**

प्रस्तुत संशोधनात वर्णनात्मक व विश्लेषणात्मक संशोधन पध्दतीचा अवलंब करुन मुलाखत व प्रश्नावली या तंत्राद्वारे प्राथमिक माहितीचे संकलन करण्यात आले ,तसेच दुय्यम स्त्रोत म्हणुन संदर्भग्रंथ मासिके , इंटरनेटचा वापर करण्यात आला.

**माहितीचे विश्लेषण :-**

बीड जिल्हयातील शेती ही निसर्गाच्या लहरीपणावर अवलंबुन आहे. बीड हा डोंगराळ, टंचाईग्रस्त व दुष्काळग्रस्त आणि ऊसतोड कामगारांचा जिल्हा म्हणुध ओळखता जातो. जिल्हयातील ऊसतोड काम करणारी एक श्रमजिवी जात म्हणुध बंजारा समाजाकडे पाहिले जाते. बंजारा ही मुळची राजस्थान राज्यातील रहिवाशी जात असुन सिंधु नदीच्या खो-यात दिर्घकाळ वास्तव होते. ही एक वैभव संपन्न जात होती, देमा । गुरु मिटु भुकिया जागी-भंगी,लकीशा बंजारा, सेवालाल महाराज या होऊन गेलेल्या राजावरुन सहज लक्षात येते.पण परकीयांच्या भारतावर अधेक वेळा झालेल्या अक्रमणामुळे हा समाज विस्थापीत होऊन देशातल्या विविध राज्यामध्ये स्थलांतरीत झाला .आज देशातील २२ राज्यामध्ये बंजारा जातीचे लोक आपल्या टोळीच्या रुपाने डोंगर द-यांत वास्तव्य करुन असलेले दिसुन येतात. त्यांच्या वास्तव्याच्या ठिकाणाला तांडा असं म्हणटले जातात. या जातीमध्ये अधेक उपजाती आहेत. उदा गोर बंजारा, बंजारा, लमानी,

**पोषाख :-**

बंजारा जातीतील पुरुषापेक्षा स्त्रियाला त्यांच्या वैषिष्टपुर्ण पोषाखामुळे चटकण ओळखता येते डोक्यावर पामडी, कानापसी चोरला,

डोक्यावर शिंगे, रंगीबेरंगी घागरा ठिकठिकाणी आरसे लावलेली चोळी डोक्यावरती रंगीबेरंगी आसरे लावलेली कोडी यावरुन बंजारा स्त्रिया पटकन ओळखता येत होत्या पण आज स्थितीमध्ये त्यांच्या पारंपारीक पोषाखात बदल झालेला असुन आनुधिक स्त्री सहावार साडी व ब्लॉऊज वारतांना दिसुन येते. तुरळक प्रमाणात पारंपारीक पोषाखातील स्त्री पहायाला मिळते. हे या जातीत झालेले मोठे परिवर्तन आहे.

**सणसमांरभ :-**

**दिवाळी :-** बंजारा समाजामध्ये दिवाळी साजरी करण्याची पध्दत वेगळच आहे. समाजामध्ये ज्या अविवाहित मुली आहेत त्या संध्याकाळी (मेरा) दिवे घेऊन तांडयामध्ये घरोघरी फिरतात. वररसे दाडेरी कोठ दवाळी याडी तोन मेरा, वररसे दाडेरी कोठ दवाळी गराशा तोन मेरा,अनकाही गाणे गातात, रात अंधेरी ये दिवलो बाळतीजो कतरा .भसियतो हाड छु करतीजो. दुस-या दिवशी कागदाची लक्ष्मीची पुजा न करता गाय मातेच्या सेनाची व निसर्गाची पुजा करतात.

**दसरा :-** बंजारा समाज दसरा साजरा करण्याची पध्दतीत बोकुड कापतात व साती देवींची आरत काढतात व पिठाने गोल वर्तुळ काढतात.व त्यामध्ये एक उभी व एक आडवी रेष मारली जाते व त्यामध्ये तांब्यामध्ये पाणी व पाण्यामध्ये लिंबाचो फादी ठेवली जाते यवरुन सिध्द होतें की, पृथ्वी गोल आहे. त्यामध्ये चार खंड आहे. त्यामध्ये पाणी आहे आणि लिंबाची फांदी यासाठी वापरली की, हा बंजारा समाज हा निसर्गाला पुजतात मुर्तीला नाही असे सिध्द होते.

**होळी :-** बंजारा समाजामध्ये होळी हा सन मोठया उत्साहामध्ये साजरा केला जातो. हिंन्दु समाजामध्ये होळीला संध्याकाळी आग्नी दिली जाते पण बंजारा समाजामध्ये होळीला संध्याकाळी अग्नी न देता दुस-या दिवशी पहाटे चार वाजता अग्नी दिली जाते. व ज्याचा मुलगा एक वर्षामध्ये जन्माला आला आहे.त्याचा (धुड) बारसा केला जातो. व त्या मुलाला काही शिकवण दिली जाते.

सिकच सिकावच सिके राज घडावाच | शिकजेरी साजपोळी जो जादा शिकवण || घियारी कचोळी ||

**बोलीभाषा :-**

बंजारा समाजचे स्वतंत्र्य बोली भाषा असुन त्या भाषेवर वेगवेगळ्या राज्यातील प्रमाण भाषेचा प्रभाव बंजारा बोलीवर पडलेला दिसुन येतो. गोर गवार अंग सदार लार बिगाड वेला करण मरगो ढार, कती कोनी लाबो आधार, अवतरी हंजो हुशार, गोर छा गोर करीया, मुईमटीन सरजीत करीया सेवाभाया तारो बोल खरो करीया. अशा प्रकारे बंजारा जातीत बोली भाषा बोलली जाते.

**जात पंचायत :-** बंजारा जातीत जात पंचायतीच्या प्रमुखाला व पंचाला पुढील प्रमाणे नावे असुन , (तांडा) - प्रमुख नायक, कारभारी, हासाबी, नसाबी, डायेसाळे, पंच लोकुर तांडो ही पंच मंडळी तांडयावर घडलेले वाद - विवाद सोडवितात अनेक वेळा लग्न समारंभामध्ये होणारे वाद घटस्फोट विधवा व परित्याक्ता स्त्रिया यांचे प्रश्न जात पंचायत सोडवते. पण आलीकडया काळात अपवादात्मक परिस्थीतीत हा प्रकारणे पोलीस स्टेशनकडे व कोर्टाकडे वर्ग होतांना दिसुन येतात. पण या जातीत पूर्वी कोर्टात जाणा-या व्यक्तीला जात पंचायतकडुन शिक्षा ठोठावली जात असे. पण आता तसे होतांना दिसुन येत नाही.

**बंजारा समाजाची आर्थीक स्थिती :-**

बीड जिल्हयातील बंजारा समाज हा बहुतंशी भूमीहीन शेत मजुर आहेत. अती अल्प लोक अल्प भुधारक आहे. म्हणुन गेवराई तालुक्यातील १०८ तांडयामध्ये बहुतंशी लोकांना आपल्या पोटाची खळगी भरण्यासाठी उसतोडणीच्या कामाला जावे लागते.

" जिवन हे संघर्ष ' आणि संघर्ष हेच जिवन " अशी या लोकांची स्थिती बघलेली आहे. वर्षातील ६ महिने हे लोक ऊसतोडीच्या कामासाठी पर जिल्हयात आणि पर राज्यात स्थलांतरीत होतात. गेवराई तालुक्यातील नव्हेतर संपुर्ण जिल्हातील बंजारा समाज हा ऊसतोड कामागार म्हणुन ओळखला जातो. या साठी गेवराई तालुक्यातील वेगवेगळया तांडयातील १०० कुटुंब प्रमुखाचे मुलाखत घेऊन माहिती संकलीत करुन तीचे विश्लेषण केले असता अतिशय वाईट आर्थीक परिस्थिती असल्याचे दिसुन आले. शेकडा १% उत्तर दाते शासकीय किंवा निमशासकीय सेवेत असल्याचे दिसुन येते म्हणजेच या जाती मध्ये प्रगत गटात मोडणा-या लोकांची संख्या खुपच कमी आहे. तांडयावर आजही रस्ते ,लाईट , पाणी, आणि शाळेची सोय झालेली नाही म्हणजेच स्वातंत्र्याच्या ७१ वर्षानांतरही बंजारा समाज मुलभुत सुविधा पासुन वंचीत आहे. तसेच काही लोक व्यसनाधिन असल्यामुळे उत्पन्नाचा बहुतंशी भाग व्यसन करण्यात खर्च होते म्हणुन बंजारा व्यक्ती कर्जात जन्मतो कर्जात जगतो. आणि कर्जात मरतो. असे मनले तरी वावगे टरणा नाही जानेवारी २०१८ ते नोव्हेंबर २०१८ या कालावधीत गेवराई तालुक्यातील ३ बंजरा शेतक-यांनी आत्महत्या केलेल्या आहेत. अल्प शेती, कोरडा दुष्काळ उत्पधात घट आणि वाढता खर्च याचा मेळ न बसल्यामुळे लोकांनी आत्महत्याचा पर्याय स्विकारल्याचे दिसुन येते. त्यांनी केलेल्य मेहनतीचे फळ त्यांच्या अज्ञानामुळे इतर लोक लाटताना दिसुन येतात. आणि जे काही अल्प प्रमाणात शिक्षण घेतलेले आहोत त्यांच्या हातला योग्य काम मिळत नाही म्हणुन उपास मारीची वेळ येते.

**बंजारा समाजाचे शैक्षणिक स्थिती.:-**

गेवराई तालुक्यातील १०८ तोंडयावरील निवडक लोकांच्या शैक्षणिक स्थितीचा आढावा घेतला असात या जातीमध्ये शिक्षणाचे प्रमाण अतिशय कमी प्रमाणात असलेले दिसुन येते तांडयावरचे लोक ऊसतोडीच्या कामाला जात असल्यामुळे मुलांना आपले शिक्षण अध्यावर सोडावे लागते. अनेक मुले शिक्षण सोडुन वडीलांच्या हातीतील कोयता आपल्या हातात. घेतात. शिक्षणाची पुरेशी व्यवस्था प्रत्येक तांडयावर दिसुन येत नाही. आणि शिक्षणाचे माध्यम मराठी भाषा असल्यामुळे ती भाष कळत नाही. त्यामुळे मुलांना शिक्षणात गोडी लागत नाही आणि तांडयावरच्या मुलांना शिकवण्या बाबत शिक्षक देखील उदासिन असलेले दिसुन येतात. त्यामुळे बंजारा समाजात शिक्षणाचा प्रसार होऊ शकला नाही.

**सारांश :-**

वरील विश्लेषणावरुन हे स्पष्ट होते की, बंजारा जात ही एक वैभव संपन्न जात होती पण काळाच्या ओघात या जातीवर पोटाची खळगी भरण्यासाठी मिळेल ते काम करण्याची व भटके जिवन जगण्याची वेळ आजही त्यांच्या वाटयाला आलेले दिसुन येते. त्यांच्या कांही प्रमाणात पारंपारीक प्रथा व परंपरा मध्ये बदल झालेले असले तरी प्रथा व परंपराचा प्रभाव आजही दिसुन येतो या जातीत अल्प भुधारक लोकांचे प्रमाण जास्त असुन सुर्शिक्षत लोकांचे प्रमाण खुपच कमी आहे.

**निष्कर्ष :-**

१.बंजारा समाजातील लोकांधा उत्पधाचे साधन म्हणुन पुरेशी शेती नसल्यामुळे त्यांना ऊसतोडी कामगार म्हणुन काम करतात.

२.बंजारा समाजामध्ये व्यसनाधीन लोकांचे प्रमाण जास्त आहे.

३.बंजारा समाजातील लोकांना केलेल्या श्रमाचा मोबदला पुरेशा प्रमाणात मिळत नाहीत.

४. बंजारा समाजातील शिक्षणाचे प्रमाण कमी असले तरी हा समाज शिक्षणाच्या प्रवाहात सहभागी असल्याचे दिसुन येते. पण दुष्काळामुळे स्थलांतरीत झालेल्या कामगांराच्या पाल्याच्या शिक्षणांचा प्रश्न गंभीर बनला असुन. त्यांना अर्ध्यावर शिक्षण सोडावे लागत आहे. तिच मुले शिक्षण सोडुन आपल्या पालकांना कामात मदत करतांना दिसुन येतात.

५. या जातीला शासनाच्या विविध योजनाचा विशेष फायदा झाला नाही. आजही काही तांडयावर विज, रस्ते, पाण्याची पुरेशी सुविधा असलेले दिसत नाही.

६.शासकीय योजना तांडयापर्यंत पोहचवीण्यासाठी शासकीय अधिकारी व कर्मचारी उदासिन असलेले दिसुन येतात. त्यामुळे तांडयाच्या विकासला चालना मिळत नाही.

**शिफारशी :-**

१.तांडयातील लोकांच्या उत्पन्नवाढ होण्यासाठी त्यांना कायमची शेती म्हणुन शासकीय गायरान जमीनी देण्यात याव्यात.

२. वाडी, तांडयावर शिक्षणाची सोय व्हावी म्हणुन गाव तेथे शाळा या म्हणी प्रमाणे तांडा तेथे शाळा असले पाहिजे. कारण आजही अनेक तांडयावर शाळा धसल्याचे स्पष्ट झालेले आहे.

३. मुलाना शिक्षणात गोडी लागण्यासाठी त्याच्या बोलीभाषेत शिकवणा-या शिक्षकांची नियुक्ती करावी.

४. तांडयावरील लोकांचे आरोग्य संवर्धन करण्यासाठी आरोग्यविषयक सोई सुविधा उपलब्ध करु द्याव्यात.

५. पाणी , विज, आणि रस्ते, या सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी शासनाने विशेष लक्ष द्यावे

६. वृदधांना मिळणा-या पेन्शन मध्ये वाढ करावी म्हणजे त्यांचा उदरनिर्वाहाचा प्रश्न मिटेल.

७.ऊसतोड कामगार मजुराच्या मुलांच्या शिक्षणाची व्यवस्था म्हणुन साखर शाळा प्रत्येक साखर कारखान्यावर उभारण्यात यावी.

**संदर्भ सुची :-**

१.चव्हाण रामनाथ, (मार्च २००२ ), भटक्या विमुक्तीची जात पंचायत.साधना प्रकाशन, पेज क्र. १८५ - १८६

२.देवगावकर शैलजा (डिसेबंर २००९ )महाराष्ट्रातील निवडक जाती जमाती, साईनाथ प्रकाशन, धागपुर,पेज क्र. २९ ते ३७

३.राठोड गवर्सासिह ,(आगष्ट२०१२), गोर बंजारा हिध्दु व बोध्द धर्मांचे स्वरुप आणि सबंध प्रकाशन औरंगाबाद.

४.पवार नामदेव, (डिसेंबर २०१५) , बटवा कविता संग्रह, गोर प्रकाशन, नांदेड.

५.काशिनाथ , (ऑक्टोंबर २०११), गोर सिकवाडीर गरज , गोर प्रकाशन, नांदेड.

६. काशिनाथ , (मार्च २०१८) गोर वळख , गोर प्रकाशन,नांदेड.

७. काशिनाथ , (डिसेंबर २०१५) , आपळ कुळ गोर प्रकाशन, नांदेड.

८. काशिनाथ , (धांव्हेंबर २०१२) , गोरर हाल , गोर प्रकाशन, नांदेड.

९. इंटरनेट .

64

# महाराष्ट्रातील विमुक्त—भटक्या जाती— जमाती व इतर मागासवर्गीय विकासात लोकनेते गोपीनाथ मुंडे यांचे योगदान

प्रा.जिजाराम रेशिमगव कावळे
खोलेश्वर महाविद्यालय, अंबाजोगाई

***********

भारतीय समाज हा अनेक धर्मपंथ आणि जाती पोट-जातीच्या लोकांचा समुह आहे.या देशातील प्रत्येक जात ही वेगवेगळी आहे जाती— पोटजातींचे लोकजीवन निरनिराळे आहे. एका जातीचा दुसऱ्या जातीशी थेट संबंध नाही. प्रत्येक जातीतील व्यक्ती स्वत:ची जात इतरांच्या जातीपेक्षा वेगळी व श्रेष्ठ मानते. त्यामुळे या देशात जाती अंतर्गत समानतेची बंधूभावाची किंवा एकात्मतेची भावना निर्माण होण्श्यास अडचणी निर्माण होतात.

भारतात भटक्या जमातीचे स्वतंत्र तत्वज्ञान आहे. त्यानुसार जमातीतील लोकांच्या जीवनक्रमावर सर्व बाबतीत संपूर्णपणे नियंत्रण ठेवणारा राज्यसत्तेशी समांतर असलेली जमाती अंतर्गत जातपंचायतीची स्वतंत्र शासन व्यवस्था आहे. या जमाती व राज्यशासन यांच्या संबंधाचा विचार केला तर शासकीय कायद्याचे निर्बंध या जमातीवर जरुर पडले आहेत. परंतु कायद्याचा लाभ मात्र जमातींना तीळमात्र फायदा नाही. म्हणून देशातल्या एका दगडावर किंवा एका झाडावर मालकी हक्क सांगण्याइतका अधिकार नसलेले कोट्यवधी भटके विमुक्त या देशात आहेत.

गावगाड्याच्या परिघाबाहेर जगणाऱ्या भटक्या विमुक्त जमातीचे आणखी एक वेगळे जग अनेक वर्षापासून या देशात उपजिवीकेसाठी सतत भटकत आहेत. आधुनिक काळात त्याला पालावरचे जग असे म्हटले जाते. भटक्या जमातीतील प्रत्येक जमातीची रुढी परंपरा चालिरिती भाषा व लोकजीवन वेगळे असल्याचे आढळून येते. एक जमात दुसऱ्या जमातीसारखी आढळत आहे. त्याची बोली भाषा,संस्कृतीत दागदागिने, देवदेवता, विवाहाच्यां पध्दतीत वेगळेपण आढळुन येते.

१८७१ साली इंग्रज सरकारने देशात लागु केलेल्या गुन्हेगार जमाती कायदा तब्बल ८० वर्ष या देशात अस्तित्वात राहीला. १९५१ ला हा कायदा संपुष्टात आला. मात्र त्यांची प्रत्यक्ष अंमलबजावणी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी लिहिलेल्या भारतीय घटनेनुसार १९६० साली झाली. २३ ऑगस्ट १९६० या दिवशी भारताचे पहिले पंतप्रधान पंडीत जवाहरलाल नेहरु यांनी हजारोभटक्या जमातीच्या उपस्थितीत सोलापुर येथील सेंटलमेंटचे तीन तारेचे कुंपन तोडुन कुंपनातील गुन्हेगार जमातींना मुक्त केले.